युवाराष्ट्र दर्शन
# चंद्रपूर जिल्हा
शनिवार दि.७ फेब्रुवारी २०२६


## दोन वाघांच्या झुंजीत अवयस्क वाघाच्या बछड्याचा मृत्यू, ताडोबाच्या कक्ष क्रमांक ८४२, नियतक्षेत्र शिवनी येथील घटना



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.६ :** ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर विभागातील शिवनी वनपरिक्षेत्रात एका अवयस्क वाघाच्या बछड्याचा मृत्यू झाल्याची घटना आज दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी उघडकीस आली.सदर माहिती कळताच स्थानिक वनपरिक्षेत्र अधिकारी अरविंद पेंदम व त्यांचे सहकारी तसेच बफर विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक एस.एस. डुबे, एनटीसीए चे प्रतिनिधी बंडू धोत्रे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे प्रतिनिधी मुकेश भांदककर, डॉ. विलास गावखरे (सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, मुल) व डॉ. बजरंग सवारे (पशुधन विकास अधिकारी, सिंदेवाही) डॉ कुंदन पोडचेलवार पशु वैद्यकीय अधिकारी टीटीसी हे घटनास्थळी पोहचले.प्राथमिक तपासातून असे निदर्शनास येते की, सदर बछड्याचा मृत्यू दोन वाघांमधील झुंजीत झालेला आहे. सदर बछड्याचे मृतदेह कक्ष क्रमांक ८४२, नियतक्षेत्र शिवनी येथे आढळून आला.घटनास्थळाच्या पाहणीवरून वाघाच्या मानेवर जखमा असल्याचे तसेच वाघाचा मागचा भाग खाल्याचे दिसून आले.यांमुळे मेलेला वाघ हा नर आहे का मादी याची पुष्टी होऊ शकली नाही.त्यानंतर वाघाचे शवविच्छेदन करण्यात आले व एनटीसीए च्या मानक प्रक्रियेनुसार (एस्ड) सदर मृतदेहाचे दहन करण्यात आले.

# जिल्हा नियोजनासाठी ६५८ कोटींची अतिरिक्त मागणी

## पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची बैठक



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.६ :** जिल्ह्यास विविध स्त्रोतातून प्राप्त होणा-या निधीतून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास केला जातो. यात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना व इतर योजनांचा समावेश आहे. सन २०२६-२७ च्या जिल्हा नियोजनासाठी मंजूर नियतव्ययाव्यतिरिक्त ६५८ कोटींची अतिरिक्त मागणी करण्यात आली आहे.

राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक आज (दि.६) नियोजन सभागृह येथे पार पडली. यावेळी आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), किशोर जोरगेवार (चंद्रपूर), देवराव भोंगळे (राजुरा), करण देवतळे (वरोरा), जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्यवनसंरक्षक एम.एन.रामानुजन, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त नरेश अकुनूरी, प्र.जिल्हा नियोजन अधिकारी सुभाष कुमरे, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, सहायक आयुक्त समाजकल्याण विनोद मोहतूरे यांच्यासह संबंधित कार्यान्वयन यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शासनाकडून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेकरीता ३५८ कोटी ८९ लक्ष रुपये, अनुसूचित जाती उपयोजनेकरीता ७५ कोटी तर आदिवासी उपयोजनेकरीता १११ कोटी ४८ लक्ष रुपये, कमाल वित्तीय मर्यादेत मंजूर करण्यात आले आहे. मात्र पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत, जिल्हा वार्षिक योजनेच्या ३५८ कोटी व्यतिरिक्त अधिकचा ४५० कोटींचा निधी, अनुसूचित जाती उपयोजनेच्या ७५ कोटी व्यतिरिक्त अधिकचा ५८ कोटी आणि आदिवासी उपयोजनेच्या १११ कोटी व्यतिरिक्त अधिकचा १५० कोटी अशी एकूण ६५८ कोटींची अतिरिक्त मागणी करण्यात आली आहे.

यावेळी बैठकीत २६ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास व अनुपालन अहवालास मंजुरी देण्यात आली. तसेच जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०२५-२६ अंतर्गत मंजूर कामे व माहे जानेवारी २०२६ अखेर झालेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. जिल्हा वार्षिक योजनेच्या सन २०२६-२७ च्या शासनाची वित्तीय मर्यादा लक्षात घेऊन एकूण ५४५ कोटी ३६ लक्ष ८२ हजार रुपये खर्चाचा आराखडा सादर करण्यात आला.

या बैठकीत अंमलबजावणी यंत्रणामार्फत एकूण ११३४ कोटी १५ लक्ष २४ हजार एवढी अतिरिक्त मागणी केलेली आहे. यात सर्वसाधारण योजनेसाठी ८२१ कोटी ९३ लक्ष ७३ हजार, अनुसूचित जाती उपयोजनामध्ये ५८ कोटी ६९ लक्ष ६९ हजार, आदिवासी घटक कार्यक्रमासाठी २५३ कोटी ५१ लक्ष ८२ हजार रुपये एवढी अतिरिक्त मागणी आहे. प्रस्तावित राज्यस्तरीय बैठकीत जिल्ह्यातील विकास कामांना जास्तीत जास्त निधी वाढवून घेऊ, असे राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री.डॉ.अशोक वुईके यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले, लोकप्रतिनिधी हे विकास कामांसाठी आग्रही असणे स्वाभाविक आहे. विविध विभाग प्रमुखांनी समितीच्या बैठकीत उपस्थित झालेल्या प्रश्नांप्रती अधिक सकारात्मक राहून लोकप्रतिनिधींना अनुपालन अहवालातील माहिती तात्काळ दिली पाहिजे. जिल्ह्याच्या सीमेवर तसेच इतर ठिकाणी सीसीटीव्ही लावण्याचे यंत्रणेने नियोजन करावे. प्रत्येक तालुका स्तरावरील विश्रामगृह हे सुसज्ज व सोयीसुविधायुक्त करावे. जिल्ह्यातील सीकलसेल ?नेमिया व हत्तीरोग निर्मुलनासाठी अधिक प्रभावी मोहीम राबवावी. जिल्ह्यातील बहुतांश गावांमध्ये स्मशानभूमी नसणे हे दुर्दैवी आहे. विकास कामांमध्ये ग्रामपंचायत भवन आणि गावात स्मशानभुमीचे बांधकाम प्राधान्याने घ्यावे. वीज कनेक्शनअभावी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना बंद ठेवू नका, अशा सुचना पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिल्या.

बैठकीच्या सुरवातीला माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

### विशेष अभिनंदनाचा ठराव

जिल्हाधिकारी विनय गौडा आणि जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी चंद्रपूर जिल्ह्यात अतिशय चांगले काम करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. या बाबीची दखल घेऊन आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विशेष अभिनंदनाचा ठराव मांडला. जिल्हा नियोजन समितीने एकमुखाने या ठरावास मान्यता देऊन जिल्हाधिकारी गौडा व पोलिस अधिक्षक सुदर्शन यांचे विशेष कौतुक केले.

# काँग्रेसच्या २७ नगरसेवकांची एकत्रित गटनोंदणी

## राजेश अडूर यांची अधिकृत गटनेतेपदी निवड



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.६ :** महानगरपालिकेत काँग्रेस पक्षाने अखेर एकत्रित गटनोंदणी करत सत्तास्थापनेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. काँग्रेसच्या एकूण २७ नगरसेवकांची एकत्रित गटनोंदणी करण्यात आली असून, नगरसेवक राजेश अडूर यांची अधिकृतपणे काँग्रेस गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसमध्ये गटनोंदणीवरून अंतर्गत मतभेद उफाळून आले होते. गटनेतृत्वावरून दोन गटांमध्ये मतभिन्नता असल्याने गटनोंदणी रखडली होती. मात्र, पक्षश्रेष्ठींच्या हस्तक्षेपानंतर आणि हायकमान्ड स्तरावर झालेल्या चर्चेनंतर अखेर सर्व नगरसेवक एकत्र आले असून, एकमताने गटनोंदणी पूर्ण करण्यात आली आहे.

राजेश अडूर यांची गटनेतेपदी निवड झाल्याने काँग्रेसमधील अंतर्गत वादाला पूर्णविराम मिळाल्याचे मानले जात आहे. अडूर यांच्यावर अनुभव, संघटन कौशल्य आणि सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन चालण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. गटनेता निवडीनंतर काँग्रेसच्या नगरसेवकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

महापौर व उपमहापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही गटनोंदणी काँग्रेससाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहे. एकत्रित गटनोंदणीमुळे काँग्रेसची बार्गेनिंग पॉवर वाढली असून, सत्तास्थापनेच्या समीकरणात काँग्रेस पुन्हा मजबूत स्थितीत पोहोचली आहे. महापौर पदावर काँग्रेसचा दावा अधिक ठोस होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.दरम्यान, काँग्रेसने एकजूट दाखवत गटनोंदणी पूर्ण केल्याने भाजप तसेच इतर राजकीय पक्षांच्या हालचालींनाही वेग येण्याची शक्यता आहे. चंद्रपूर मनपातील सत्तासमीकरणे आता आणखी रंजक व चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

### बहुमतासाठी काँग्रेसला ३ नगरसेवकांची आवश्यकता

महानगरपालिकेतील सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला असून, बहुमताचा आकडा गाठण्यासाठी काँग्रेसला आत तीन नगरसेवकांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले आहे. एकत्रित गटनोंदणी करत काँग्रेसने आपले संख्याबळ २७ वर नेले आहे. पप्पू देशमूख यांच्या जनविकास सेनेचे ३ नगरसेवक व एमआयएम १ असे ४ नगरसेवक मिळून महानगर आघाडीची गटनोंदणी झालेली आहे.पप्पू देशमूख यांनी काँग्रेससोबत आघाडी करुन निवडणूक लढविली होती.यावरुन काँग्रेसकडे ३१ चे संख्याबळ पोहचले आहे.बहुमतासाठी आवश्यक असलेला ३४ चा जादुई आकडा गाठण्यासाठी काँग्रेसला तीन सदस्यांची आवश्यकता आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, तीन नगरसेवकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी काँग्रेसकडून विविध स्तरांवर प्रयत्न सुरु आहे. दुसरीकडे शिवसेना (उबाठा) ने महापौर पदासाठी नामांकन दाखल केले आहे.महापौर पदासाठी ठाम भूमिका घेतलेल्या शिवसेना (उबाठा) यांच्या विना संख्याबळ जुळविण्यासाठी काँग्रेसचे प्रयत्न सुरु असल्याचे सुत्राकडून सांगण्यात येत आहे.२ अपक्ष तसेच १ बसपा यांच्यासोबत बोलणी सुरु असल्याचे सांगण्यात येत आहे.मात्र २ अपक्षांना सोबत घेण्यावर कुणाचाही आक्षेप राहुनये यासाठी मनधरणी सुरु असल्याचे बोलले जात आहे.बहुमतासाठी केवळ तीन नगरसेवकांची गरज असताना काँग्रेस कितपत यशस्वी ठरते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.अन्यथा शिवसेना (उबाठा) शिवाय पर्याय नसल्याने, इतर पदांच्या वाटाघाटीवर काय निर्णय समोर येतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.महापौर निवडणुकीपूर्वी राजकीय वातावरण अधिकच तापले असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## 'पोलीस चौकीच्या शेजारी सट्टा, ग्रामपंचायतच्या कुशीत दुसरा अड्डा!

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**माढेळी दि.६ :** माढेळी गावात सट्टा पट्टीचा अवैध धंदा उघडपणे सुरू असून, धक्कादायक बाब म्हणजे हे दोन्ही सट्टा अड्डे थेट प्रशासनाच्या नाकावर टिच्चून चालू असल्याचं चित्र आहे.

गावात सट्टा चालवणारे दोन 'महारथी' सध्या बिनधास्तपणे आपला बेकायदेशीर व्यवसाय चालवत असल्याची जोरदार चर्चा आहे. एक महारथी पोलीस चौकीच्या अगदी शेजारी बसून सट्टा चालवतो, तर दुसरा महारथी ग्रामपंचायत कार्यालयाच्या आसपास आपला सट्टा अड्डा चालवतो स्वतःला तोताया पत्रकार आहे मनून सांगतो . म्हणजेच, दोघेही उघडपणे सट्टा पट्टी चालवत आहेत, आणि तरीही कारवाईचा पत्ता नाही! 'कायदा कुणासाठी आहे?' असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. पोलीस चौकी आणि ग्रामपंचायत इतक्या जवळ असतानाही सट्टा धंदा सुरू असणं म्हणजे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.या सट्टा पट्टीमुळे गावातील तरुण पिढी वाईट मार्गाला लागण्याची भीती व्यक्त होत असून, पालकांमध्ये चिंतेचं वातावरण आहे. 'या दोन महारथींना कोणाचं पाठबळ आहे?' आणि 'कारवाई नेमकी कधी होणार?' असे प्रश्न आता उघडपणे विचारले जात आहेत.प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन दोन्ही सट्टा अड्ड्यांवर कडक कारवाई करावी, अन्यथा हा अवैध धंदा आणखी फोफावून माढेळीचं वातावरण बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांतून होत आहे.

## जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.६ :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमत योजनेंतर्गत धानाचे प्रलंबित चुकारे तातडीने मिळावेत, यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनजी भुजबळ यांना पत्र लिहीले होते. तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव अनिल डिगीकर यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली होती. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी धान खरेदीचे १०३ कोटी ८ लाख ६३ हजार ३६१ रुपये इतके चुकारे मंजूर करण्यात आले आहेत.आ. मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीची दखल घेत प्रधान सचिवांनी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात धानाच्या चुकाऱ्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असे आश्वासन दिले होते.

### नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे ओळखपत्र निःशुल्कच

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.६ :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना ओळखपत्र (स्मार्ट कार्ड) जिल्हा कामगार सुविधा केंद्र तसेच तालुका कामगार सुविधा केंद्रामार्फत निःशुल्क वितरीत करण्यात येते. परंतु काही व्यक्ती दलालांमार्फत पैसे घेऊन बनावटी ओळखपत्र (स्मार्ट कार्ड) दिले जात असल्याच्या तोंडी तक्रारी प्राप्त होत आहेत. करीता कोणत्याही बांधकाम कामगारांनी सदरील व्यक्ती /दलाला मार्फत बनावटी ओळखपत्र न घेता जिल्हा कामगार सुविधा केंद्र तसेच तालुका कामगार सुविधा केंद्रातून आपले ओळखपत्र (स्मार्ट कार्ड) घ्यावे.सदर ओळखपत्र (स्मार्ट कार्ड) हे निःशुल्क असल्याने कोणाही व्यक्तीस /एजंट यांना पैसे देऊ नये. तसेच पैशांची मागणी करणाऱ्या संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय यांनी केले आहे.

### आर-सेटीच्या वतीने स्वयंरोजगाराबाबत मोफत प्रशिक्षणाचे आयोजन

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.६ :** बँक ऑफ इंडिया ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (आर-सेटी), चंद्रपूरच्या वतीने बल्लारपूर मार्गावरील जुने डी.एड. कॉलेज जवळ, बाबूपेठ येथे ग्रामीण व शहरी भागातील युवक व युवतींसाठी १२ दिवसांचे मोफत प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणाची सुरवात १४ फेब्रुवारी २०२६ रोजी होईल.या प्रशिक्षणात वेगवेगळ्या प्रकारचे केक बनविणे, फास्ट फूड, पेस्ट्री, कूकिस व मंचुरियन नूडल्स, मोमोज, चायनीज प्रॉडक्ट, पाणीपुरी, शेव पुरी, चाट, समोसे, कचोरी, साबरवडी, शाबुदाणावडी व इतर ही प्रॉडक्ट शिकविण्यात येतील.

# चंद्रपूर जिल्हा कारागृहात सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे लोकार्पण



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.६ :** चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे चंद्रपूर जिल्हा नियोजन समितीच्या स्थानिक निधीतून मंजूर करण्यात आलेल्या (Decentralised Prefabricated Packaged Jail Liquid Waste Management System) सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे लोकार्पण जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते करण्यात आले.चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे बंद्यांच्या दैनंदिन वापरातून निर्माण होणाऱ्या अंदाजे १ लक्ष लिटर सांडपाण्याची साठवणूक होत होती. दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी कारागृहात आयोजित अभिविक्षक मंडळाच्या बैठकीत कारागृहातील सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प राबविण्याबाबत जिल्हाधिकारी महोदयांनी निर्देश दिले होते.सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्याने चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे प्रतिदिन निर्माण होणारे सुमारे १ लक्ष लिटर सांडपाणी शुद्ध करण्यात येणार असून, शुद्ध पाण्याचा कारागृह परिसरातील झाडे व हरित क्षेत्राच्या सिंचनासाठी पुनर्वापर करण्यात येणार आहे. यामुळे नवीन पाण्यावरील अवलंबित्व कमी होणार आहे. सांडपाणी थेट बाहेर सोडले जाणार नसल्याने भूजल प्रदूषणास प्रतिबंध, तसेच परिसरातील दुर्गंधी, डास व रोगराई कमी होण्यास मदत होणार असून, कारागृहातील बंदी व कर्मचारी यांच्यासाठी स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणाची निर्मिती होणार आहे.सदर प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समितीद्वारे रुपये १.०५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येऊन मे. लाइफफर्स्ट कॉन्सेप्ट्स ॲण्ड टेक्नॉलॉजीज प्रा. लि., पुणे यांना काम मंजूर करण्यात आले. या एऊइ प्रकल्पाची क्षमता १०० CMD (१ लक्ष लिटर प्रतिदिन) इतकी आहे.

# ७ व ८ फेब्रुवारी राजी चिमुरात गुरु रविदास जयंती कार्यक्रमाचे आयोजन

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**चिमूर दि.६ :** चर्मकार समाज संघटना चिमुर च्या वतीने दि. ७ व ८ फेब्रुवारी रोजी चर्मकार समाज सभागृहात गुरु रविदास जयंती व मुर्तीची प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी परिसर स्वच्छता झाल्यानंतर ७ वाजता घटस्थापना करण्यात येईल. यावेळी विजय विरूळकर, सुभाष कानझोडे विकास नवले, धनंजय नवले, विस्वास कानझोडे, झिंगू येरेकर यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दुपारी १२ वाजता रांगोळी स्पर्धा व सायंकाळी ५ वाजेपर्यंत हळदी कुंकु कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.दि. ८ फेब्रुवारी रोजी सदगुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेची चिमुर शहरात भव्य मिरवणुक काढण्यात येणार आहे. या मिरणुकीचे नियोजन विक्की नंदरे, राजु नवले, सुरज वाकडे, सुरेश शिंगाडे, श्रेयश नंदारे, राहुल नवले, राकेश नवले, वैभव नवले, पवन इंगोले, रूपम नवले, कवडु कानझोडे, परसराम नंदरे, गजानन इंगोले, मनोज नवले, अमोल नवले, प्रकाश शिंगाडे, गोवर्धन नवले, प्रविन वाकडे, मिथुन इंगोले, ऋषभ इंगोले, अंकित नवले, सचिन नवले, शुभम शिंगाडे, साहिल नवले, अजय शिंगाडे, गोपाल डहाके, सुहास कानझोडे, प्रमोद अंडेलकर, कुणाल ढाक, मंथन नवले, प्रशांत नवले, विशाल शिंगाडे, तुषार सिंगनजुळे, आदी कार्यकर्ता गण नियोजन करीत आहेत. दुपारी १२ वाजता सुरेश महाराज सोनटक्के यांचे किर्तन झाल्यानंतर दुपारी ३ वाजता सदगुरु रविदास महाराज याच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येईल.प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमाला आमदार बंटी भांगडिया, चिमुरच्या नगराध्यक्ष गिता लिंगायत, उप नगराध्यक्ष संजय नवघडे, नगर सेवक कविता बानकर, प्रशांत तळवेकर, सामाजिक कार्यकर्ते समिर राचलवार, आयुष कामडी, कमलकिशोर असावा, आदि मान्यवर उपस्थित राहणार आहे.कार्यक्रमाला सहकार्य करण्याचे आवाहन चर्मकार समाज संघटनेचे अध्यक्ष नाना शिंगाडे सचिव चंद्रशेखर नवले,सुनील ढाक, धनंजय नवले, नंदू इंगोले, उत्तम नवले, यांनी केले आहे.



# गावागावात अध्यात्मिक व सामाजिक बळ निर्माण करण्याचे ध्येय

## आ.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला निर्धार



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.६ :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर मतदारसंघातील गावागावांमध्ये सामाजिक आणि अध्यात्मिक बळ निर्माण करणे हेच आपले ध्येय असल्याचा निर्धार व्यक्त केला. बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील भजन मंडळे आणि महिला बचत गटांना त्यांच्या हस्ते साहित्य वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

गावागावात अध्यात्मिक वातावरण निर्माण होणे आणि महिला बचत गटांनामध्ये स्वावलंबनाचे बळ निर्माण होणे हेच या उपक्रमामागील प्रमुख ध्येय आहे. भजन, कीर्तन आणि सामाजिक उपक्रमांमुळे गावांमध्ये सकारात्मकता वाढते, तर महिला बचत गटांच्या माध्यमातून कुटुंबाच्या अर्थकारणाला हातभार लागतो. त्यामुळे समाजाच्या सर्व घटकांना सक्षम करण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याचे आमदार मुनगंटीवार म्हणाले.

बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील मुल, बल्लारपूर, पोंभूर्णा व चंद्रपूर या चार तालुक्यांतील विविध भजन मंडळे आणि महिला बचत गटांना साऊंड सिस्टिम व स्वयंपाकासाठी लागणाऱ्या भांड्यांचे वितरण आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते श्री कन्यका माता मंदिर सभागृह, चंद्रपूर येथे करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा,श्री माता कन्यका सेवा संस्थेचे सचिव राजेश्वर सुरावार ,श्रीनिवास जंगमवार, बंडू गौरकार, चंदू मारगोनवार, गौतम निमगडे, केमाताई रायपुरे, वर्षाताई लोनबले आदिंची उपस्थिती होती. या उपक्रमांतर्गत एकूण ११३ मंडळांना साऊंड सिस्टिम आणि ६० महिला बचत गटांना १५ हजार रुपये किमतीच्या स्वयंपाकाच्या भांड्यांचे वाटप करण्यात आले.

मुल तालुक्यातील ५६ मंडळांना साऊंड सिस्टिम व ३२ महिला गटांना भांड्यांचे पास देण्यात आले. पोंभूर्णा तालुक्यातील २९ मंडळांना साऊंड सिस्टिम व १२ गटांना भांडी, चंद्रपूर तालुक्यातील २० मंडळांना साऊंड सिस्टिम व ८ गटांना भांडी, तर बल्लारपूर तालुक्यातील ८ मंडळांना साऊंड सिस्टिम व ८ गटांना भांडी आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वितरित करण्यात आली.गावातील नागरिक, भजन मंडळे तसेच कार्यकर्त्यांकडून या संदर्भात मागणी करण्यात आली होती. गावांमध्ये भजनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध असून साऊंड सिस्टिम उपलब्ध झाल्यास गावागावात आध्यात्मिक वातावरण निर्माण होण्यास मोठी मदत होईल, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यापूर्वीही विधानसभा क्षेत्रात पहिल्या टप्प्यात १८० भजन मंडळांना आणि दुसऱ्या टप्प्यात २३ भजन मंडळांना असे एकूण २०३ भजन मंडळांना साहित्यांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच ६५ वर्षांवरील ९,९०० ज्येष्ठ नागरिकांना काठीचे वाटप करून त्यांना आधार देण्यात आला. नेत्रचिकित्सा शिबिरांद्वारे ५० हजारांहून अधिक नागरिकांचे डोळे तपासण्यात आले असून ३५ हजार नागरिकांना चष्मे देण्यात आले. तर ७ हजारांहून अधिक रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.याशिवाय, चंद्रपूर येथे १४० बेडसचे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात आले असून अवघ्या एका महिन्यात ८०० रुग्णांनी येथे उपचार घेतले आहेत. राज्यात ज्या आधुनिक सोयी उपलब्ध नाहीत, त्या सुविधा मतदारसंघात उभारण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी आमदार मुनगंटीवार यांनी सांगितले.

## जैताई मंदिरात व्याख्यान...

•युवाराष्ट्र दर्शन वणी
संस्कार भारती समिती, सागरझेप बहुद्देशीय संस्था व जैताई मंदिर द्वारे भारत माता पूजन व स्व. माधव सरपटवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. दि 6 फेब्रुवारी ला सायंकाळी 6.30 वाजता जैताई मंदिर परिसरात चंद्रपूर येथील प्रसिद्धी वक्ते प्राचार्य दिलीप चौधरी यांचे राष्ट्रहितासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य या विषयावर व्याख्यान होणार आहे. तसेच वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र, रोख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. वणीतील सर्व नागरिकांनी व्याख्यान ऐकण्याकरिता येण्याचे करावे तसेच श्रोत्यांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## संक्षिप्त

### रस्त्याच्या कारणावरून महिलेस मारहाण

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ : जागेची मोजणी करण्यासाठी आलेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना आम्हाला जायला रस्ता राहणार की नाही असे विचारल्यावरून आरोपींनी संगणमत करीत महिलेला काठीने मारहाण केली यात संबंधीत महिलेला पायावर, हातावर गंभीर दुखापत झाली ही घटना वडगाव जंगल परिसरात ४ फेब्रुवारी रोजी घडली याप्रकरणी दुर्गा पांडूरंग घरत (५०) यांनी वडगाव जंगल पोलिसात तक्रार दिली त्यावरून अमोल सुदाम अहिरकार (३५) व त्याचा एक साथीदार सर्व रा वडगाव जंगल यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला

### इसमावर हल्ला

यवतमाळ : शेतात झालेले काम सांगण्याच्या कारणावरून आरोपीने एका इसमावर कोयत्याने हल्ला केला यात यशवंत आनंद लाड (६०) यांच्या चेहऱ्यावर व इतर ठिकाणी गंभीर जखमा झाल्या ही घटना महगाव कसबा येथे ५ फेब्रुवारी रोजी घडली याप्रकरणी दिपक शेषेराव लाड (४५) रा महागाव कसबा यांनी लाडखेड पोलिसात तक्रार दिली त्यावरून गोपाल पोपटराव गाठेकर (४१) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला

### मोकळ्या प्लॉटमधील मातीची चोरी

यवतमाळ : तीघा जणांनी संगणमत करीत एका प्लाटमधून ट्रॅक्टरद्वारे ६० ते ७० हजाराची काळी माती खोदून ती चोरून नेली ही घटना एमआयडीसी लोहारा प्लॉट नं ३९ येथे उघडकीस आली याप्रकरणी तुकाराम थावरा जाधव (६७) रा शिवनेरी सोसायटी आर्णी रोड यांनी लोहारा पोलिसात तक्रार दिली त्यावरून तिघा जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला

# उपनगराध्यक्षांसह कुटुंबाचे बंदुकीच्या धाकावर अपहरण ?

## मध्यरात्री घडलेल्या थराराने महागाव शहरात खळबळ

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, महागाव , दि. ६ फेब्रुवारी

शिवसेना उपजिल्हा प्रमुख, महागाव नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष प्रमोद उर्फ शाखा भरवाडे यांच्यासह त्यांच्या पत्नी आणि दोन मुलींचे राहत्या घरातून अपहरण झाल्याची धक्कादायक घटना ५ फेब्रुवारीच्या मध्यरात्री घडली आहे. अज्ञात आरोपींनी देशी कट्ट्याचा धाक दाखवून भरवाडे कुटुंबीयांना त्यांच्याच कारमधून पळवून नेल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

शिवसेना उबाठा उपजिल्हाप्रमुख तथा महागाव नगर पंचायतीचे उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे यांचे भाऊ सचिन भरवाडे यांनी याप्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ५ फेब्रुवारीच्या रात्री संपूर्ण कुटुंब जेवण करून झोपले होते. मध्यरात्री २:३० च्या सुमारास दोन अनोळखी इसमांनी घराचा दरवाजा ठोठावला. सचिन भरवाडे यांनी दरवाजा उघडला असता, आरोपींनी "पोलीस स्टेशनचे काम आहे" असे सांगून घरात प्रवेश केला. सचिन यांनी त्यांचा मोठा भाऊ प्रमोद यांना उठवताच आरोपींनी आपले हिंसक रूप धारण केले. एका आरोपीने प्रमोद भरवाडे यांना धक्काबुक्की केली, तर दुसऱ्याने त्यांची मोठी मुलगी वैष्णवी हिच्यावर देशी कट्टा रोखून "हालचाल केल्यास ठार मारण्याची" धमकी दिली.

दहशतीचे वातावरण निर्माण करून आरोपींनी प्रमोद भरवाडे, त्यांची पत्नी प्रियंका आणि दोन मुलींना घरासमोर उभ्या असलेल्या स्विफ्ट डिझायर कारमध्ये (क्रमांक एम.एच ४६एन६८३९) जबरदस्तीने बसवले. विशेष म्हणजे, आरोपींनी प्रमोद भरवाडे यांनाच गाडी चालवण्यास भाग पाडले. "पोलीस स्टेशनला कळवले तर जीवाने मारू, आमचे काम झाले की चार दिवसांनी त्यांना सोडून देऊ" अशी धमकी देऊन आरोपींनी घटनास्थळावरून पोबारा केला. या घटनेमुळे महागाव शहरात भीतीचे सावट पसरले असून, पोलीस आता आरोपींचा आणि अपहृत कुटुंबाचा कसून शोध घेत आहेत.

या घटनेची माहिती मिळताच ठाणेदार धनराज निळे , उपोनि अमोल राठोड,स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि धीरज बांडे, उपपोनि शरद लोहकरे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिसरातील सर्व सीसीटीव्हींची पाहणी करून तपास कामी पथक रवाना केली आहेत.उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन आरोपींचा शोध घेऊन अपहृत कुटुंबाची लवकरात लवकर सुखरूप सुटका करण्याच्या सुचना दिल्या आहेत. एकाच वेळी संपुर्ण परिवाराचे बंदुकीच्या धाकावर अपहरण केल्या गेल्याने महागाव शहरासह तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले असुन अपहरण कर्त्यांचा शोध घेवुन भरवाडे परिवाराची सुखरूप सुटका करण्याचे तगडे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे. या घटनेचा पुढील तपास महागाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली उप पोलीस निरीक्षक अमोल राठोड करीत आहेत.

**चारचाकी आढळली मानवाडी फाट्यावर.**

**ज्या स्विफ्ट डिझायर गाडीतून उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे व त्यांच्या परिवाराचे अपहरण करण्यात आले ती गाडी नांदेड जिल्ह्यातील हदगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीतील मानवाडी फाट्यावर आढळुन आली असुन महागाव पोलिसांनी ती गाडी त्याठिकाणावरून जप्त करून महागाव पोलिस स्टेशन मध्ये जमा केली आहे.**

**भरवाडे यांचे अपहरण झाल्याची तक्रार अद्याप पोलिस स्टेशनला प्राप्त झाली नाही.परंतु मिळालेल्या माहितीच्या आधारावर सुरक्षेच्या दृष्टीने आम्ही तपास सुरू केला आहे.**
**:- धनराज निळे (ठाणेदार पो. स्टे.महागाव)**

# परसोडा ग्राम पंचायत नाव लौकिकास प्राप्त

## -मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान स्पर्धेच्या तयारीची पाहणी



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. ६ फेब्रुवारी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ह्या महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेल्या उपक्रमात अनेक ग्रामपंचायतने सहभाग नोंदविला परंतु नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून स्पर्धेत आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या परसोडा ग्रामपंचायतची जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी पाहणी केली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतने स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला. गाव खऱ्या अर्थाने समृद्ध करणे करिता महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविले आहे ह्यात तालुक्यातील परसोडा गावाची तयारी कशा पद्धतीने चालू आहे ह्यांचे पाहणी करणे करिता व घरकुल लाभार्थी यांचे भूमिपूजन करिता जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की आले असतांना गावातील नाविण्यपुर्ण उपक्रम याची पाहणी करून परसोडा गाव जिल्हास्तरीय पुरस्काराच्या स्पर्धेत असून अश्याच प्रकारची तयारी करावी असे ग्रामस्थांना सांगितले. प्राथमिक मराठी शाळा जिल्हा परिषद चे विद्यार्थी यांनी लेझीम पथका द्वारे पत्की यांचे स्वागत करण्यात आले. ह्यावेळी आर्णी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रमेश खारोडे, विस्तार अधिकारी इंगोले, ठाकरे, बघेल यांची प्रमुख उपस्थिती होती तर सरपंच प्रा स्वप्ना अतुल देशमुख, माजी सरपंच अतुल पाटील देशमुख, उपसरपंच सुनंदा पत्रे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर राठोड, अजाब पत्रे, मंगला चौधरी, जिप शाळेचे मुख्याध्यापक बाबाराव वानखडे, नारायण वेट्टी यासंह महिला बचत गटाचे सदस्य, ग्रामस्थ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# १० हजार विद्यार्थ्यांचा रंगणार 'शक्ती-भक्ती संस्कार कुंभ'

## रामजन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराजांची विशेष उपस्थिती

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ६ फेब्रुवारी

भारतीय संस्कृती, परंपरा आणि संस्कारांची ज्योत जगभर प्रज्वलित करणाऱ्या 'गीता परिवारा' च्या वतीने येत्या सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी यवतमाळमध्ये एका अभूतपूर्व सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'शक्ती भक्ती संस्कार कुंभ' असे या कार्यक्रमाचे नाव असून, यामध्ये १० हजारांहून अधिक शालेय विद्यार्थी सामूहिक सूर्यनमस्कार आणि गीता पठणातून शक्ती आणि भक्तीचा जागर करणार आहेत.

या भव्य कार्यक्रमाला गीता परिवाराचे संस्थापक, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष आणि राष्ट्रसंत प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांची पावन उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली



हा संस्कार सोहळा संपन्न होईल.

**सामूहिक सूर्यनमस्कार** : विद्यार्थ्यांद्वारे सूर्यनमस्काराची विलोभनीय प्रात्यक्षिके सादर केली जातील. **श्रीमद् भगवद्गीता पठण** : गीता परिवाराच्या जागतिक अभियानाचा भाग म्हणून हजारो विद्यार्थी गीतेच्या बाराव्या अध्यायाचे (भक्तियोग) सामूहिक पठण करतील. मैदानी खेळांची प्रात्यक्षिके शारीरिक स्वास्थ्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध देशी खेळांची प्रदर्शने होतील.

सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:०० ते १०:३० या वेळेत, नेहरू स्टेडियम, यवतमाळ येथे हा सोहळा रंगणार आहे.

चार दशकांपूर्वी संगमनेरच्या पावन भूमीतून प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराजांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

**बालसंस्कारांचे जाळे** : आज २१ राज्यांमध्ये आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गीता परिवाराचे कार्य विस्तारले आहे.

**विश्वविक्रमी कामगिरी**: कोट्यवधी सूर्यनमस्कारांचे अभियान राबवून संस्थेने यापूर्वीच अनेक जागतिक विक्रम आपल्या केले नावावर आहेत.

**लर्न गीता**: कोव्हीड काळात नैराश्यात असलेल्या जगाला आशेचा किरण दाखवण्यासाठी डॉ. संजय मालपाणी (राष्ट्रीय कार्याध्यक्ष) यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू झाला. आज ६५ देशांतील नागरिक या माध्यमातून गीतेचे शिक्षण घेत आहेत. संगमनेरसारख्या शहरातून सुरू झालेला हा प्रवास आज वैश्विक झाला आहे. यवतमाळच्या मातीत होणारा हा 'संस्कार कुंभ' भावी पिढीला संस्कृतीशी जोडणारा ठरेल. तरी जिल्ह्यातील नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मदन येरावार जिल्हाध्यक्ष, गीता परिवार, यवतमाळ यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला डॉ. स्नेहल राशतवार, सौ. मृणल राशतवार, डॉ. योगीता चव्हाण, डॉ. महेश चव्हाण, डॉ. प्रेमदास पकडे, शंतनु शेटे आदींची उपस्थिती होती.

# ८ फेब्रुवारीला तळेगाव येथे सहविचार सभा

## प्रा. वसंत पुरके : संसदेतील गदारोळावर व्यक्त केली खंत

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ६ फेब्रुवारीला

आदिवासी समाज हा अतिशय गरिबी आणि निरक्षरतेशी झुंज देत आहे. त्यामुळे केवळ बघतो, पाहतो, करतो असे म्हणणारे नेतृत्व नको. आदिवासींमधून सक्षम नेतृत्व घडले पाहिजे. त्यासाठीच आदिवासी काँग्रेसच्या माध्यमातून येत्या ८ फेब्रुवारीला यवतमाळनजीकच्या तळेगाव येथे विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यात मार्गदर्शन करण्यासाठी आदिवासी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विक्रांत भुरिया येत आहेत. आमदार बाळासाहेब मांगूळकर, राज्य कार्यकारिणीचे पदाधिकारी, २२ जिल्ह्यातील कार्यकारिणी पदाधिकारी व यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी



बांधव उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आदिवासी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रा. वसंतराव पुरके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लोकशाहीमध्ये विरोधी पक्षनेता हा 'नेक्स्ट टू पीएम' असतो. त्यामुळे लोकशाहीची खरी मदार ही विरोधी पक्षनेत्याच्या खांद्यावरच असते. मात्र सध्याचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पळ काढत आहेत. राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावरही संसदेत चर्चा घडवून आणली जात नाही, अशा शब्दात माजी शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंतराव पुरके यांनी खंत व्यक्त केली.

शुक्रवारी (दि. ६) विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी संसदेतील सध्याच्या गदारोळासंदर्भात आपली भूमिका मांडली. ते म्हणाले की, चिनच्या घुसखोरीबद्दल राहुल गांधी यांनी माजी सेनाप्रमुख सरवणकर यांच्या पुस्तकाचा संदर्भ देत मुद्दे मांडले. सरकारची चूक झाली असेल तर माफी मागितली पाहिजे. चूक कोणाकडूनही होऊ शकते. त्यात काही वावगे नाही. देशाचे नेतृत्व हे निर्भिड आणि निर्वैर असले पाहिजे. देशाच्या संरक्षणाशी संबंधित मुद्द्याकडे दुर्लक्ष होऊ नये. . या पत्रकार परिषदेला ॲड. सीमा तेलंगे यांची उपस्थिती होती.

# क्रीडा स्पर्धेत दिव्यांग विद्यार्थ्यांचे सुयश



•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी प्रतिनिधी, दि. ५ फेब्रुवारी

दि.3 व 4 फेब्रुवारीला यवतमाळ येथे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय यवतमाळ द्वारा आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांचे जिल्हा क्रीडा स्पर्धा व संस्कृतीक कार्यक्रम पार पडल्या सदर स्पर्धेचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती मंगला मून यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

सदर स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील सर्वच प्रवर्गातील दिव्यांग शाळेने सहभाग घेतला होता. सर्वच शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वयोगटात वेगवेगळ्या खेळाच्या प्रकारात यश संपादन केले असून ढाणकी येथील. स्व. थावराजी नाईक निवासी दिव्यांग विद्यालय ढाणकी येथील विद्यार्थिनी कु. जयश्री पंजाब मेंडके हिने वयोगट 8 ते 12 मध्ये 50 मीटर धावणे मध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे.तर 25 मिटर कुबडी धावणे मध्ये कु. स्वरांजली गणेश जाधव हिने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. सोबतच. मधुकरराव नाईक निवासी मुकबधिर विद्यालय ढाणकी या विद्यालयातील विद्यार्थी शिवम दिलीप मडावी याने.16 ते 21 या वयोगटात 400 मीटर धावणे मध्ये प्रथम क्रमांक पाठविले आहे. तर पवन पंडित पावडे याने 12 ते 16 वयोगटात गोळा फेक मध्ये द्वितीय क्रमांक पाठविला आहे.कु. नंदिनी सुदर्शन आडे या विद्यार्थिनीने 16 ते 21 या वयोगटात 400 मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक फटकावले आहे. सर्व विजेत्या खेळाडूंचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती मंगला मून यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात असून विद्यार्थ्यांच्या या सुमार कामगिरीबद्दल स्व. चांदीबाई शिक्षण संस्थेचे मानद सचिव एस.एन. पवार अध्यक्ष, जनाबाई शेषराव पवार सदस्य, सुदर्शन पवार, विद्यालयाचे मुख्याध्यापक भोने यांनी कौतुक केले असून राज्यस्तरीयसाठी शुभेच्छा दिल्या आहे . विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय विद्यालयातील शिक्षक शंकर चव्हाण, आडे, काळे, पाटील, रावते, डि.एन.. जटाळे व एन डी.आडे यांना दिले आहे

## प्लेसमेंट ड्राईव्ह'चे आयोजन

यवतमाळ : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, यवतमाळ यांच्या अंतर्गत एसआयएस सुरक्षा आणि गुप्तचर सेवा (इंडिया) लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने "पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह"चे आयोजन करण्यात आले आहे. हा प्लेसमेंट ड्राईव्ह ९ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये राबविण्यात येणार असून दररोज सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.३० या वेळेत पंचायत समिती सभागृहात भरती प्रक्रिया पार पडणार आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्हअंतर्गत सुरखा जवान व सुरक्षा पर्यवेक्षक या पदांसाठी एकूण ३५० रिक्त जागा उपलब्ध असून त्यामध्ये ३०० सुरक्षा जवान व ५० सुरक्षा पर्यवेक्षक पदांचा समावेश आहे.

# नजूल जमिनीची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी

## मृद व जलसंधारण मंत्री,आदिवासी विकास मंत्री,आमदार व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ६ फेब्रुवारी

यवतमाळ शहरातील शासकीय मालकीच्या नजूल (नजुल) जमिनींबाबत पारदर्शकता राखावी तसेच त्यांची सीट नंबरनिहाय, क्षेत्रफळनिहाय व सद्यस्थितीनिहाय अद्ययावत माहिती सार्वजनिक करावी,या मागणीसाठी शेतकरी चळवळ, यवतमाळ यांच्या वतीने (बुधवार), दिनांक ५ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ येथे निवेदन सादर करण्यात आले. या वेळी यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा प्रा. डॉ.अशोक उईके, आमदार बाळासाहेब मांगुळकर तसेच जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून ही बाब मांडण्यात आली.



निवेदनात नमूद करण्यात आले की,यवतमाळ शहराच्या विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर नजूल जमिनी अस्तित्वात असून,शहर पोलीस स्टेशन परिसर,नगरपालिका परिसरालगतची जमीन, दारव्हा रोड, आर्णी रोड, अवधूतवाडी पोलीस स्टेशन परिसर तसेच इतर नागरी वसाहतीलगत शासकीय क्षेत्रांचा त्यामध्ये समावेश आहे. विश्वसनीय प्रशासकीय माहितीनुसार संपूर्ण यवतमाळ शहरात सुमारे २०० हेक्टरपर्यंत नजूल जमीन असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असला, तरी यासंदर्भातील अधिकृत व अद्ययावत माहिती आजही सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध नाही,ही बाब गंभीर असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ तसेच शासनाच्या विविध नियम व परिपत्रकांनुसार नजूल जमिनींची योग्य नोंद ठेवणे,अतिक्रमण रोखणे आणि माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे वैधानिक कर्तव्य आहे.मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी नजूल जमिनींच्या सीमारेषा अस्पष्ट असून,काही ठिकाणी अनधिकृत वापर व नोंदींमध्ये तफावत असल्याच्या तक्रारी समोर येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या प्रसंगी सोशल मीडिया काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, सचिन मनवर, आकाश जिरे,आकाश जाधव व प्रा.पंढरी पाठे उपस्थित होते.

# नामदेव महाराज यांच्या मुर्तीस्थापणेचा वर्धापनदिन उत्साहात

## संत शिरोमणी नामदेव महाराज समाज उन्नती मंडळाचा पुढाकार, धार्मीक, सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ६ फेब्रुवारी

शहरातील जांब मार्गावर असलेल्या संत नामदेव महाराज यांच्या मंदिरातील संत शिरोमणी नामदेव महाराज आणि विठ्ठल रुख्मिणी यांच्या मुर्तीस्थापणेचा वर्धापन दिन सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने आठ दिवस विविध धार्मीक आणि सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संत शिरोमणी नामदेव महाराज समाज उन्नती मंडळाच्या पुढाकारात हा कार्यक्रम पार पडला. मंदिरामध्ये



पुजा व कलश स्थापना करुन, परिसरात भव्य पालखी मिरवणुक काढुन २३ जानेवारी रोजी कार्यक्रमांची सुरूवात करण्यात आली. त्यात २४ ते ३० जानेवारी दरम्यान दरदिवशी दुपारी भजन, कीर्तन पार पडले. ३१ जानेवारी रोजी सायंकाळी सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. १ फेब्रुवारी रोजी सकाळी कीर्तनकार राजु साखरकर व संच यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व वैशिष्ट पुर्ण सत्काराचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक सुभाष ढोणे उपस्थित होते. त्यांच्यासह आमदार बाळासाहेब मांगुळकर, भास्कर टोम्पे, प्रभाग २९ चे नवनिर्वाचित नगरसेवक बीपीन चौधरी, माजी सैनिक भगवान कापसे, विक्री कर अधिकारी नितीन तीजारे, उद्योजक विजय देशकर, संत शिरोमणी नामदेव महाराज समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष जीतेंद्र फुसे, उपाध्यक्ष गजानन तीजारे मंचावर उपस्थित होते. यांच्या उपस्थितीत सर्व गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. सांस्कृतीक स्पर्धेतील विजयी आणि सहभागी स्पर्धकांना यावेळी पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष जीतेंद्र फुसे यांनी केले. सूत्रसंचालन आदिती फुसे, जयप्रकाश तीजारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरीता मंडळाचे सचिव विनेश वंदेकर, राहुल ढोणे, नितीन कापसे, सुनील डवले, अजय दीडमुठे, अजय गोहणे, योगेश चिंचोळकर, मनोहर कापसे, श्रीकांत बोबडे, सुनील कापसे, संगीता दांडेकर, नरेंद्र फुसे, विशाल चवलढाल, कल्पना फुसे, कल्याणी तीजारे आदींनी अथक परिश्रम घेतले. अवघ्या काही महिन्याच्या अंतराने विविध शासकीय विभागामध्ये तब्बल तीन पदांवर निवड झालेल्या आणि नुकते वित्त व लेखा अधिकारी वर्ग एक या पदावर रुजू झालेल्या समाजातील होतकरु तरुण शुभम काशीनाथ जी तीजारे यांचा सत्कार या कार्यक्रमादरम्यान करण्यात आला. यावेळी शुभमच्या यशामध्ये मोलाचा वाटा असणाऱ्या त्यांच्या आई छाया आणि वडील काशीनाथ यांचाही सत्कार करण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी केली जंगल सफारी.



•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी यवतमाळ, दि. ६ फेब्रुवारी

विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाबद्दल प्रेम निर्माण करणे आणि त्यांना जंगल व वन्यजीवांबाबत शिक्षित करणे या उद्देशाने सामाजिक वनीकरण विभाग यवतमाळ च्या वतीने हरित सेनेच्या विद्यार्थ्यांकरिता निसर्ग शिबिर आयोजित करण्यात आले. यात वेदधारीनी विद्यालयाच्या ५० विद्यार्थ्यांनी टिपेश्वर अभयारण्यात जंगल सफारी केली आणि तेथील जैवविविधता, पक्षी दर्शन, वनौषधी आणि वनव्यवस्थापनाची माहिती प्रत्यक्ष जाणून घेतली. या निसर्ग शिबिराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी जंगल सफारीचा थरारक अनुभव घेतला. ज्यामुळे त्यांच्यात निसर्गाविषयी प्रेम व जबाबदारीची भावना रुजली. घनदाट जंगलातून फिरताना विद्यार्थ्यांनी वन्य प्राणी, पक्षी आणि दुर्मिळ वनस्पती पाहिल्या, ज्यामुळे त्यांना निसर्गाची जवळून ओळख झाली. निसर्ग सहलीत वेदधारीनी विद्यालयातील शिक्षक व शिक्षिका सहभागी झाले, सामाजिक वनीकरण च्या विभागीय वनअधिकारी प्रणीता पारधी, वनपरिक्षेत्र अधिकारी शंकर मडावी तसेच त्यांचे अधिनस्त वनपाल, वनरक्षक आणि टिपेश्वर येथील वनपरिक्षेत्र अधिकारी प्रफुल सुनोले यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली.

युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया
जिल्हा
शुक्रवार, दि.७ फेब्रुवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

## बहुआयामी आरोग्य मापदंडांसाठी योगिक हस्तक्षेप; एकदिवसीय राष्ट्रीय परिषद



**देवरी :** पारंपारिक निरोगी जीवनशैली आणि आधुनिक विज्ञान यांच्या समन्वयाला चालना देण्यासाठी, शहरात 'बहुआयामी आरोग्य मापदंड साध्य करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी योगिक हस्तक्षेप' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. या कार्यक्रमात शिक्षणतज्ज्ञ, आरोग्य तज्ज्ञ आणि योग अभ्यासकांनी एकत्र येत योगसाधनेच्या सर्वांगीण फायद्यांवर सखोल चर्चा केली. ही परिषद चार नामांकित संस्था एम. बी. पटेल कॉलेज देवरी, एस. बी. सिटी कॉलेज नागपूर, नागपूर शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर, ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालय यांच्या विशेष शैक्षणिक सहकार्यातून साकारली गेली.

नागपूरमधील जामठा येथील एएश कॉलेजच्या सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बहुविद्याशाखीय अभ्यास विभागाच्या अधिष्ठाता डॉ. राजश्री वैष्णव यांच्या हस्ते झाले. आरोग्याकडे बघताना विविध ज्ञानशाखांच्या एकत्रित दृष्टिकोनाचे महत्त्व त्यांनी यावेळी अधोरेखित केले. सुप्रसिद्ध योगाचार्य डॉ. मन्माथ घरोटे यांनी बीजभाषण केले, ज्यातून परिषदेची वैचारिक उंची उंचावली गेली.

परिषदेच्या तांत्रिक सत्रांचे नेतृत्व डॉ. सौरभ निलेश आणि डॉ. तेजसिंग जगदाळे यांनी केले. त्यांनी शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर योगाच्या मोजता येण्याजोग्या प्रभावावर लक्ष केंद्रित केले. या उपक्रमाला शैक्षणिक क्षेत्रातून मोठा प्रतिसाद मिळाला: १७० हून अधिक सक्रिय सहभागी, २७ शोधनिबंधांचे प्रत्यक्ष सादरीकरण, प्रकाशनासाठी ५० हून अधिक शोधनिबंधांची निवड. कार्यक्रमाचा समारोप औपचारिक पारितोषिक वितरण व निरोप समारंभाने झाला. याप्रसंगी आर.टी.एम.एन.यू. सिनेट सदस्य श्री. विष्णू चांगदे मुख्य अतिथी म्हणून, तर क्रीडा मंडळाच्या सचिव डॉ. सुवर्णा भालेराव सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होत्या. प्राचीन ज्ञान आणि आधुनिक संशोधन यातील दरी सांधणारा मंच उपलब्ध करून दिल्याबद्दल दोन्ही वक्त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. या परिषदेच्या यशाचे श्रेय राजेंद्र जैन, निखिल जैन, डॉ. अरुण झिंगरे डॉ. सुजित मेत्रे यांच्या मार्गदर्शनाला देण्यात आले. या परिषदेचे आयोजन सचिव डॉ. तपन दत्ता, डॉ. संजय चौधरी, डॉ. अमित टेंभूर्णे, डॉ. विजय दातारकर हे होते. तसेच, राष्ट्रीय स्तरावरील हा मेळावा यशस्वी करण्यासाठी डॉ. चंद्रमणी गजभिये, डॉ. सुनीता रंगारी, डॉ. अभिनंदन पाखमोडे, डॉ. सुधीरकुमार भंडारकर आणि डॉ. गोपाल हलमारे यांच्यासह सर्व प्राध्यापक वृंदाचे त्यांच्या अथक परिश्रमाबद्दल विशेष आभार मानण्यात आले.

## कुष्ठरोग जनजागृती : भेदभाव समाप्त करू या, सन्मानाची वागणूक देऊ या



**गोंदिया :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त ३० जानेवारी हा कुष्ठरोग निवारण दिन म्हणून साजरा केला जातो.या अनुषंगाने जिल्ह्यात राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाअंतर्गत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान तसेच कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अंतर्गत 'कुसुम' विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. ३१ जानेवारी रोजी देवरी तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा ककोडी येथे कुसुम व स्पर्श अभियान बाबत रॅली काढुन जनजागृती करण्यात आली. आश्रमशाळेचे मुख्याध्यापक एस. आर. मोडघरे यांचेसह कार्यक्षेत्रातील आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आशा सेविका यांचे सह शिक्षक वृंद यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यात जिल्हाधिकारी प्रजित नायर,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी अभिजित गोल्हार यांच्य सुचनेनुसार सहाय्यक संचालक कुष्ठरोग महेंद्र धनविजय व वैद्यकीय अधिकारी भाग्यश्री गावंडे यांचे प्रत्यक्ष कार्यवाहीत मोहिम सुरु आहे. दरम्यान ककोडी येथील जनजागती रॅली दरम्यान आरोग्य सेवक डी.वाय.बिसेन यांनी कुष्ठरोगाविषयी तांत्रिक व शास्त्रीय माहिती दिली. 'भेदभाव समाप्त करू या, सन्मानाची वागणूक देऊ या' हे स्पर्श जनजागृती मोहीम २०२६ चे घोषवाक्य असून, कुष्ठरोगाविषयी असलेले गैरसमज दूर करणे, भेदभाव कमी करणे, लवकर निदान व वेळेवर उपचाराचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. मुख्याध्यापक एस.आर.मोडघरे यांनी कुष्ठरोग हा शाप किंवा पाप नसुन तो एक जंतुचा प्रताप अस्ल्याचे सांगितले. कुष्ठरुग्णांसोबत समाजात भेदभाव न होता सन्मानाने जगण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करावे.सामाजिक कारणाने कुष्ठरोग लपवण्याकडे लोकांचा विशेषत: महिला भगिनीचा कल असतो.तरि अंगावर कुठलाही न खाजविणारा, लालसर, चकाकणारा, फुगीर व बधिर चट्टा दिसतास जवळच्या शासकीय रुग्णालयात जावुन तपासणी करुन घेण्याचे सांगितले.

## राकाँ कार्यालयात दादांना आदरांजली



**देवरी :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी निधनाने महाराष्ट्र हादरला असून देवरी शहरात शोक कळा पसरली आहे बहुजन समाजाचे नेतृत्व करणारे एक रोखठोक नेते गेल्याने देवरीच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली असून राष्ट्रवादी पोरकी झाली असल्याचे मत स्थानिक नेत्यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात अजितदादानां श्रद्धांजली वाहण्याकरिता श्रद्धांजली सभेचे आयोजन आज गुरूवार (ता.२९ जानेवारी) रोजी करण्यात आले होते.

याप्रसंगी तालूकाध्यक्ष छोटेलाल बिसेन यांनी शोकसंवेदना व्यक्त करताना म्हटले की, माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता आता पोरका झाला. अजित दादा हे कधीच कशाला नाही न म्हणणारे गटतट न बघणारे अजात शत्रू नेते होते. 'जे करता येते चांगले काम करा' अशी सूचना ते सतत देत असत. मी मान्यच करू शकत नाही की अजित दादा निघून गेले आहेत. मन सुन्न झाले आहे. मोकळ्या स्वभावाचा दिलदार व हुशार नेता महाराष्ट्राने गमावला आहे. यावेळी राष्ट्रवादी देवरी तालुक्याचे गोपाल तिवारी, भैय्यालाल चांदेवार , नेमीचंद आंबीलकर, दिलीप दुरूगकर, नगरसेवक पंकज शहारे , हिनाताई टेंभरे ,सरपंच मनोहर राऊत, माजी नगराध्यक्ष सुमनताई बीसेन, माजी पं. स. सदस्य अर्चनाताई ताराम, पार्वताबाई चांदेवार रंजन मेश्राम, यूगेश बिसेन शर्मिलाताई टेंभुरकर, लक्ष्मीबाई मेश्राम, यशवंत शिवणकर, मीनाताई कुंभरे, श्रावण बिंजलेकर, रवींद्र मेश्राम, रवी बडवाईक पुष्पा मस्के उपस्थित होत्या.

## शिक्षक मान्यतेतील गैरप्रकारांवर शासनाचा मोठा घाव

**गोंदिया :** खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयत्तिक मान्यतेमध्ये होत असलेल्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कठोर भूमिका घेतली आहे. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने ३० जानेवारी २०२६ रोजी महत्त्वाचा निर्णय जारी केला आहे.

या निर्णयानुसार वैयत्तिक मान्यता देतांना संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी सखोल तपासणी करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. नियुक्ती आदेश, संस्थेचा ठराव प्रत्यक्ष रुजू झाल्याचा अहवाल, उपस्थिती नोंदी तसेच भरती प्रक्रिया शासन आदेशानुसार झाली आहे की नाही, याची काटेकोर तपासणी केली जाणार आहे. शासनाच्या निदर्शनास आले की, अनेक ठिकाणी बनावट कागदपत्रे, चुकीची माहिती व माहिती दडपून वैयत्तिक मान्यता मिळवली जात होती. अशा प्रकरणांमध्ये यापूर्वी कारवाई केवळ कर्मचारी किंवा अधिकारी यांच्यावर

### बनावट कागदपत्रांवर होणार कारवाई

होत होती. मात्र आता नियमबाह्य नियुक्तांमध्ये सहभागी असलेल्या व्यवस्थापन व संस्थांवरही थेट फौजदारी कारवाई केली जाणार आहे. शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले की, बनावट कागदपत्रे तयार करणे किंवा सादर करणे गंभीर गुन्हा असून त्यावर भारतीय न्यायसंहिते नुसार कठोर कारवाई करण्यात येईल. या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकारांवर आळा बसणार असून शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### असे आहेत शासनाचे आदेश!

शासन निर्णय ६ फेब्रुवारी २०१२ अन्वये राज्यातील खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, वैयत्तिक मान्यता, पदोन्नती व अनुषंगिक बाबीं संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयत्तिक मान्यता प्रदान करत असताना संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ व शासन निर्णय दिनांक १० जून २०२२ मधील तरतुदींसोबतच खालील बाबींची तपासणी करावी. १) प्रशासकीय नोंदी.२)संबंधित कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संदर्भात संस्थेचा ठराव. ३) नियुक्ती आदेश आणि प्रत्यक्ष रूजू झाल्याचा अहवाल.४) संबंधित कर्मचाऱ्यांच्या शाळेचा प्रत्यक्ष हजेरीपट आणि संस्थेच्या तसेच कार्यालयाच्या आवक-जावक नोंद वहीतील नोंदीची पुनःश्च पडताळणी करणे आवश्यक आहे. सदर भरती प्रचलित कार्यपध्दती आणि वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन आदेशानुसारच आहे किंवा नाही याची खात्री करणे अनिवार्य आहे.

## 'कुष्ठरोग निर्मूलन शपथ' व 'अरुणोदय सिकलसेल' जनजागृती



**गोंदिया:** प्राथमिक आरोग्य केंद्र तिगाव अंतर्गत उपकेंद्र कॉपीटोला येथील चिमणटोला गावात आज ३ फेब्रुवारी रोजी आरोग्य विभागाच्या वतीने दुहेरी मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 'कुसुम' मोहिमे अंतर्गत कुष्ठरोग निर्मूलनाची शपथ घेण्यात आली, तसेच 'अरुणोदय' मोहिमेअंतर्गत सिकलसेल आजाराबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली.

'कुसुम' मोहिमेचे औचित्य साधून उपस्थित विद्यार्थी आणि ग्रामस्थांना कुष्ठरोग निर्मूलनाची शपथ देण्यात आली. कुष्ठरोग हा शाप नसून एक आजार आहे आणि वेळेवर उपचार घेतल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो, असा संदेश यावेळी देण्यात आला. समाजातून कुष्ठरोगाचा कलंक पुसून टाकण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन आरोग्य पथकाने केले. सिकलसेल आजाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता 'अरुणोदय' मोहिमेअंतर्गत विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींवर भर देण्यात आला.

## संत शिरोमणी तुकाराम महाराज जन्मोत्सव उत्साहात

**गोंदिया :** येथील न्यू लक्ष्मी नगर परिसरात जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराज जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या सोहळयाने भक्ती, शक्ती आणि प्रबोधनाचा अनोखा त्रिवेणी संगम घडवून आणला, ज्यात गोंदिया शहरातील हजारो भाविकांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ह.भ.प. बळीराम दादा उके यांचे प्रबोधनपर कीर्तन ठरले. त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांद्वारे उत्कृष्ट निरूपण करत उपस्थित जनसमुदायाचे प्रबोधन केले. त्यांना ॐ त्रिमूर्ती भजन मंडळाची मोलाची साथ लाभली. यामध्ये मंडळाचे अध्यक्ष रामलाल गायधने, कोषाध्यक्ष हिरामणजी डोंगरवार, सचिव भावरावजी भस्मे, ह.भ.प. उर्मिला कारेमोरे, ह.भ.प. विठाबाई कुंभालवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत भरली. जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित दहीकाला कार्यक्रमानंतर उपस्थित हजारो नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी जिल्ह्यातील अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण परिसर विठूनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी जगद्गुरु संत तुकाराम महाराज जन्मोत्सव समितीच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण उत्साहात



**सडक अर्जुनी :** येथील रवीनंदा पब्लिक स्कूल तथा ज्युनियर सायन्स कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन नगरपंचायत उपाध्यक्ष वंदानाताई डोंगरवार यांच्या हस्ते, संस्थापक रवींद्र पंचभाई यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

प्रमुख अतिथी नगरसेवक. देवचंद तरोने, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष मधुसूदन दोनोडे, डॉ राजकुमार भगत, पत्रकार बिरला गणवीर, आर. व्ही. मेश्राम, सामाजिक कार्यकर्ता रोशन बडोले, इंजि.अशोक लांजेवार, रवीनंदा कॉलेजचे प्राचार्य खोब्रागडे, प्राध्यापक आगाशे, आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नृत्य व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांचे लक्ष केंद्रित केले. कार्यक्रमाचे बक्षीस वितरण सोहळयाप्रसंगी प्रामुख्याने नगरपंचायत उपाध्यक्ष वंदना डोंगरवार, संस्थापक रवींद्र पंचभाई, रवी नंदा पब्लिक स्कूलच्या प्राचार्य सुनंदा पंचभाई, पत्रकार बिरला गणवीर ,आर .व्ही. मेश्राम, सामाजिक कार्यकर्ता रोशन बडोले, विजय पारधी आदी मान्यवर उपस्थित होते. विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आले. कार्यक्रमाला पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका करिश्मा मानकर आणि. शिक्षक रामटेके यांनी केले . कार्यक्रमाचे साठी. शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व कर्मचारी आणि सहकार्य केले.

## अमृत तर्फे उद्योजकता विकास कार्यक्रमात निःशुल्क प्रशिक्षण

**गोंदिया :** अकॅडमी ऑफ महाराष्ट्र रिसर्च अप्लीफ्टमेंट ट्रेनिंग सेंटर (अमृत) यांच्या वतीने सात दिवसीय निःशुल्क उद्योजकता विकास कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा उद्देश युवक व युवतींना स्वयंरोजगार, उद्योजकता, व्यवसाय नियोजन व आर्थिक स्वावलंबन याबाबत सक्षम करणे हा आहे. या प्रशिक्षणामध्ये व्यवसाय संधी ओळख, प्रकल्प अहवाल तयार करणे, शासकीय योजना व कर्ज प्रक्रिया, मार्केटींग कौशल्य, मुलभूत आर्थिक नियोजन, उद्योग सुरु करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सहभागी लाभार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. हा कार्यक्रम पूर्णतः निःशुल्क असून १८ ते ५५ वयोगटातील इच्छुक युवक व युवतींना सहभागी होता येईल.

## आरोग्यवर्धिनी उपकेंद्र बटाणाच्या आरोग्य सेवांचा घेतला आढावा



**गोंदिया :** सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार बाघमारे यांनी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र बटाणा येथे भेट देऊन सुरू असलेल्या विविध आरोग्य सेवा व राष्ट्रीय कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान, ग्र्ञ (असंसर्गजन्य आजार) कार्यक्रम यांचा विशेषत: आढावा घेण्यात आला तसेच सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी तपासण्यात आली.

या भेटीत कुष्ठरोग स्पर्श अभियान, मुख्यालयी राहून आरोग्य सेवा देणे, ''ण्ड कार्यक्रम, मलेरिया, क्षयरोग आदी राष्ट्रीय कार्यक्रमांच्या कामकाजाचा आढावा घेऊन संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य सेवा अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख पद्धतीने राबवाव्यात, असे निर्देश डॉ. बाघमारे यांनी दिले.यावेळी जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी विजय आखाडे यांनी बाबत सविस्तर आढावा घेऊन जनजागृती उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी मार्गदर्शन केले. या आढावा बैठकीस जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी श्रीमती अर्चना वानखेडे व कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी श्री. श्याम लिचडे उपस्थित होते. तसेच आरोग्यवर्धिनी उपकेंद्र भटाणा येथील ण्ष् चित्रा रहंगडाले, उषा गजभिये यांनी आपल्या कार्याचा अहवाल सादर केला. याशिवाय प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खोब्रागडे व आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ. ठाकरे यांचीही उपस्थिती होती.

## सिकलसेल अभियानाची अधिकाऱ्यांनी केली पाहणी



**गोंदिया :** सिकसेल आजाराचे उच्चाटन करण्याच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या वतीने १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने २८ जानेवारी रोजी जिल्हास्तरीय अधिकारी, पर्यवेक्षकांनी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील आरोग्य स 'स्थांना भेटी देवून अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया अभियानाची पाहणी केली. दरम्यान अभियान यशस्वीरित्या राबविण्याचे मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतुन सिकलसेल आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी राज्यातील 'अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' राबविण्यात येत आहे.जिल्हाधिकारी प्रजित नायर व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथन यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले यांच्या प्रत्यक्ष कार्यवाहीत जिल्ह्यातील आरोग्य संस्थेमार्फत सिकलसेल आजाराबाबत तपासणी, निदान व उपचार,समुपदेशन व जनजागृती करण्यात येत आहे. दरम्यान अर्जुनी मोरगाव तालुक्यातील आरोग्य संस्थांना भेटी अधिकाऱ्यांनी भेट दिली. यावेळी राष्ट्रीय आरोग्य विभागाचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अर्चना वानखेडे, जिल्हा मुल्यमापन व संनियत्रण अधिकारी उकादास बिसेन, सार्वजनिक अधिपारीचारिका निलु चुटे, आरोग्य सेविका कल्याणी चौधरी यांनी आयुष्मान आरोग्यवर्धिनी मंदिर बाराभाटी व कुंभीटोला येथे भेट देवुन अभियानाची पाहणी केली. ग्राम पातळीवरील आशा सेविका, आरोग्य सेवक व आशा सेविका यांनी सिकलसेल ग्रस्त व वाहक यांची यादी बनवुन त्यांना आवश्यक लागणारे औषधी फॉलिक ॲसिड नियमित देणे तसेच आवश्यक रुग्णांना लागणारे हायड्रॉक्सीयुरिया जवळच्या ग्रामिण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्राकडुन निशुल्क उपलब्ध करुन देण्याच्या सुचना दिल्या.सिकलसेल तपासणी झालेले व्यक्ती व तपासणी शिल्लक लाभार्थीची यादी बनविने, शासन मार्गदर्शक सुचनेनुसार लार कार्ड, पिवळे कार्ड व पांढरे कार्ड वाटप करुन त्यांची माहीती ठेवण्याच्या सुचना दिल्यात, कार्यक्षेत्रातील ० ते ४० वयोगटातील महिला व पुरुष, गरोदर माता, किशोरवयीन बालकांची सिकलसेल संबधाने रक्त तपासणी व समुपदेशन करण्याविषयी मार्गदर्शन सुचना दिल्या. यावेळी भेटी दरम्यान आरोग्य संस्थेचे समुदाय आरोग्य अधिकारी गौरव टेंभेकर व तृप्ती गहाणे, आरोग्य सेविका निराशा शहार,यमुना मानापुरे व सविता कोडाप,आशा सेविका कल्पना भंडारी व वंदना धानगाये उपस्थित होते

